
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता

संपादक

डॉ. संभाजी पाटील



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता (संपादित)**

**Dr. Babasaheb Aambedkar Yanchi Patrakarita (Ed.)**

**संपादक :**

डॉ. संभाजी पाटील

**संपादक मंडळ :**

डॉ. गोविंद उफाडे, प्रा. बापूसाहेब जवळेकर

डॉ. शिवराज काचे, डॉ. विजयकुमार करजकर

ISBN 978-93-5240-198-7

अरुणा प्रकाशन

१०३, ओमकार कॉम्प्लेक्स - अ,

खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर

मो. ९४२१४ ८६९३५, ९४२१३ ७१७५७

© सर्व हक्क - प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

प्रथम आवृत्ती : ३१ मार्च २०२२

मुद्रक : आर्टी ऑफसेट, लातूर

अक्षर जुळवणी : हिंदवी कॉम्प्युटर, लातूर

मूल्य : ५००.०० रुपये

*'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता' या ग्रंथातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांची असून त्या संबंधी कॉलेज प्रशासन, संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित,

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

व

## राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने

आणि

**भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई, प्रायोजित**
**भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता :**
**शतकपूर्तीनिमित्त मराठी विषयाचे दोन दिवसीय**

## राष्ट्रीय चर्चासत्र

## विषय : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता: शोध आणि बोध

**दिनांक : ३० व ३१ मार्च २०२२**

---

भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई, यांच्या अनुदानातून दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न होत आहे. या राष्ट्रीय चर्चासत्रात सादर झालेल्या ५३ शोधनिबंधाचा

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता**

हा संपादित ग्रंथ प्रकाशित होत आहे.

**सदरील ग्रंथासाठी भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद पश्चिम विभागीय केंद्र, मुंबई, यांच्याकडून अनुदान प्राप्त झाले आहे.**

---

**: आयोजक :**

**डॉ. महादेव गव्हाणे**

प्राचार्य

| डॉ.संभाजी पाटील | डॉ.ओमप्रकाश शहापूरकर | डॉ. अभिजीत यादव | प्रा.सदाशिव शिंदे |
|---|---|---|---|
| चर्चासत्र समन्वयक | परीक्षा नियंत्रक | समन्वयक,अं.गु.ह.कक्ष | उप-प्राचार्य |


**राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर**

**मध्यवर्ती बसस्थानकासमोर, चंद्रनगर, लातूर- ४१३५१२, फोन नं.-०२३८२ २४५९३३**

१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता - एक मानवतावादी दृष्टिकोन
डॉ. वनमाला लोंढे ........ १८२
१३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नियतकालिकातील कथा
बाबासाहेब भा. खंडाळे, डॉ. यशवंत सोनुने ........ १८८
१४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रीय लेखनशैली
प्राचार्य डॉ. हरिश्चंद्र निर्मळे ........ १९३
१५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक'ची प्रासंगिकता
डॉ. गोविंद उफाडे ........ २०७
१६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूकनायकातील सामाजिक न्यायाची संकल्पना
प्रा. बापूसाहेब जवळेकर, डॉ. संभाजी पाटील ........ २१७
१७. 'मूकनायक' वृत्तपत्रातील समाजचिंतन
डॉ. शिवराज काचे ........ २३२
१८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार
डॉ. शंकर कल्याणे ........ २३९
१९. निर्भीड पत्रकार डॉ. भीमराव आंबेडकर
डॉ. जे. टी. कांबळे ........ २४६
२०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृतपत्रिकेतील स्त्री
मनिषा लातूरकर ........ २५३
२१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता : मूल्यशोध
डॉ. जयद्रथ जाधव ........ २६१
२२. पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रीय भाषाशैली
डॉ. अशोक नारनवरे ........ २६४
२३. मानवतावादी पत्रकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर
शिवाजी मोतीबोणे ........ २७७
२४. 'जनता' मधील डॉ. आंबेडकरांची हिंदू धर्मचिकित्सा
डॉ. अनिल कांबळे ........ २८६
२५. 'मूकनायक' मधील अग्रलेख चिकित्सा
प्रा. हर्षवर्धन कोल्हापूरे ........ २९०



२६. स्फुट लेखनातील व्यक्तिवेध : रामा स्वामी नायकर व बॅ. जयकर
डॉ. जयदेवी पवार ........ २९५
२७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता : स्त्री आणि सामाजिक न्याय
डॉ. गुंफा कोकाटे ........ ३०२
२८. निर्भीड पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
डॉ. कविता लोहाळे-ताटे ........ ३०६
२९. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय लेखनविशेष
डॉ. रवींद्र बेम्बरे ........ ३११
३०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मचिकित्सा
डॉ. सुभाष कदम ........ ३२०
३१. डॉ. बाबासाहेबांच्या पत्रकारितेचे स्वरूप
डॉ. मधुबाला हुडगे ........ ३२८
३२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वयंसिद्ध पत्रकारिता
डॉ. दुष्यंत कटारे ........ ३३२
३३. बाबासाहेबांच्या पत्रकारितेतील प्रबोधन : स्वरूप व चिंतन
डॉ. बालाजी डिगोळे ........ ३४१
३४. सत्यशोधक पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
डॉ. गोविंद काळे ........ ३४७
३५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वृत्तपत्रातून आलेले शेतीविषयक विचार
डॉ. चंद्रकांत शेरखाने ........ ३५२
३६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक चिंतन
डॉ. ज्ञानदेव राऊत ........ ३५७
३७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पर्यावरण
डॉ. मल्लिकार्जुन तंगावार ........ ३६१
३८. 'बहिष्कृत भारत' मधील साहित्यविषयक विचार
डॉ. केशव आलगुले ........ ३६४
३९. 'बहिष्कृत भारत'मधील शिक्षणविषयक विचार
डॉ. गणेश लहाने ........ ३७१

# १९

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक'ची प्रासंगिकता

०००

डॉ. गोविंद उफाडे, लातूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे जननायक होय. जननायक म्हणून कोणीही कधीच जन्मत नसतो. तो 'स्व'कर्तृत्वाने संघर्षमय वाटा पादाक्रांत करीत ज्ञान आणि विवेकाच्या जोरावर स्वतःच आपली वाट निर्माण करीत असतो. जो आपल्या समाजाला जागृत व आत्मभानाची जाणीव प्राप्त करून देतो, त्यासाठी प्रसंगी प्राणांची बाजी जो लावत असतो, तोच खऱ्या अर्थाने जनांचा नायक बनत असतो. हिंदी साहित्यिक, सुप्रसिद्ध आलोचककार सुधांशू म्हणतात की, नायक पैदा नही होते नायक बनते है, अपने संघर्ष से। अपनी जीत और जूनुन से, अपमान, उपेक्षा, तिरस्कार के विरुद्ध लढने की आपनी ताकत से नायक बनते है। अपने लक्ष्योंके लिए उम्र, लगन लगा देने से।नायकत्व हासिल होता है, अपने समाज के लिए काम करने की इच्छासें।१ आपली प्रभूसत्ता अबाधित राखण्यासाठी जाणीवपूर्वक चातुर्वर्ण्य व्यवस्थेची निर्मिती करणाऱ्या सनातनी प्रवृत्ती विरोधात दलित समाजातील या महानायकाने एल्गार पुकारला. इथल्याच मातीत जन्म घेतलेल्या मुलनिवासीनांच हिंदू समाजव्यवस्थेने बहिष्कृत केले. त्यांच्या अस्पृश्य, शुद्र, म्हणून हीन व अपमानास्पद जीवन वाट्याला आले. इतकेच नव्हे तर हा समाज शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय दृष्ट्या मागास बनला गेला. 'स्व'त्व आणि आत्मविश्वास गमावून बसलेल्या या अस्पृश्य समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर या देशातील एकमेव महानायकांने हक्काची जाणीव करून देत त्याच्यातील सत्वाविभिमान जागे करण्याचे महत्त्कार्य केले. त्यांनी दिन-दलितांना स्वाभिमानाने जगण्यासाठी, स्वतःवर होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात उठाव करण्यास सिद्ध केले. त्यासाठी त्याला विचार आणि विवेकाची जोड दिली.

'गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल' हा क्रांतीस प्रेरित करणारा बंडखोर विचार बाबासाहेबांनी आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून शोषित मना-मनांमध्ये पेरण्याचे कार्य केले. बाबासाहेबांना एकूण भारतीय समाजव्यवस्थेच्या विषमतेची आणि गुणमर्यादांची प्रगल्भ जाण होती. भारतीय समाजजीवन, इतिहास, भूगोल, कला, संस्कृती, सामाजिक शास्त्रे आदी विविध विद्याक्षेत्रांचे संपूर्ण ज्ञान आणि सर्वस्पर्शी आकलन होते. एके ठिकाणी खुद्द बाबासाहेबांनीच म्हटले होते की, ''जवळ भौगोलिक असलेला देश म्हणजे राष्ट्र नव्हे, समान भाषा, वंश, जात, श्रद्धा व अस्मिता म्हणजे राष्ट्र नव्हे उलट, ही एक वस्तुनिष्ठ समूहभावना आहे.''[२] या उद्देशाने बहिष्कृत समाजजीवनाच्या उत्थानासाठी पत्रकारितेशिवाय पर्याय नाही या महत्त्वाकांक्षेने आणि ध्येयाने प्रेरित होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अपरिहार्यता म्हणून 'मूकनायक' १९२०, 'बहिष्कृत भारत' १९२७, 'जनता' १९३०, आणि 'प्रबुद्ध भारत' १९५६ या आपल्या पत्रकांचा प्रपंच केला.

प्रस्तुत लेखामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कशाचाही व कुणाचाही मुलाहिजा न बाळगता निर्भीड आणि सडेतोड भाषेत समाजव्यवस्थेला अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्याय, आत्याचार व हक्काविषयी जाब विचारून दलित समाजाला होत असलेल्या अन्यायाची जाणीव आणि आत्मभान आणून देण्यासाठी किंबहुना त्याच्या आत्मउन्नतीसाठी प्रभावी अस्त्राची निर्मिती केली. ते अस्त्र म्हणजे 'मूकनायक' पत्र होय. आज शंभर वर्षानंतर वर्तमान काळात 'मूकनायक' पाक्षिक पत्राने केलेल्या पत्रकारितेची तीव्रतेने उणीव भासते आहे.

डॉ.प्रल्हाद लुलेकर यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर: अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा'[३] मधून सांगितल्याप्रमाणे बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाला बहुआयाम लाभलेले होते. अशा ह्या जननायकाच्या वृत्तपत्राने प्रस्थापित समाजव्यवस्थेला हादरे दिलेले असल्याने 'मूकनायक'च्या निर्मितीमागील प्रसंगिकतेचा शोध घेण्याचा एक प्रयत्न या प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे. तत्पूर्वी 'मूकनायका'च्या प्रकाशनापूर्वी बहिष्कृत समाजासाठी दलित नियतकालिकांनी केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेणे प्रथम महत्वाचे वाटते.

**'मूकनायक' पूर्व दलित नियतकालिकांची कामगिरी**

वृत्तपत्र म्हणजे मत अभिव्यक्तीचे प्रभावी साधन असते. याचा उचित वापर करून आपल्या समाजाचे भवितव्य प्रकाशमान होऊ शकते हा आशावाद



उरी बाळगून एकोणिसाव्या शतकात दलित वृत्तपत्रे अस्तित्वात आली. ''दलित पत्रे आपल्या अस्तित्वाचे आणि आपल्या अस्मितेचे संवर्धन करण्यासाठी उदयाला आलेली होती.''[४] या दृष्टीने प्रयत्न करणारे पहिले गृहस्थ म्हणून गोपाळबाबा वलंगकर यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांनी १८८६ साली दापोली या आपल्या राहत्या गावी 'दोषपरिहार मंडळाची' स्थापना करून दलित उद्धाराची जणू मुहूर्तमेढ रोवली. त्याचबरोबर कीर्तनासारख्या लोककलेचा चांगल्या पद्धतीने वापर करून अस्पृश्यांना पटेल अशा भाषेत त्यांच्या हक्काविषयी जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आपल्या कीर्तनामधून हिंदू धर्मग्रंथात अस्पृश्याबद्दल मांडलेले विचार कसे धांदात खोटे आणि लबाडीचे आहे याबद्दलचे विचार प्रभावीपणे ठासून सांगितले.इतकेच नाही तर त्यासाठी गोपाळबाबा वलंगकर यांनी 'विटाळ विध्वंसन' (१८८८) या नावाची पुस्तिका लिहिली. या नंतर अस्पृश्यांच्या आत्मउन्नतीसाठी तनमनाने निष्ठापूर्वक सुधारणेसाठी महत्त्वाचे कार्य करणारे शिवराम जानबा कांबळे यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. महात्मा ज्योतिबा गोविंदराव फुले यांचे कार्य व लेखनकार्य आणि विचारांतून त्यांनी स्फूर्ती घेतली होती. त्याचबरोबर समाज सुधारक ख्रिस्ती धर्मप्रसारक बाबा पद्मजी, लोकहितवादी आदींच्या वैचारिकतेतून तयार झालेले शिवराम जानबा कांबळे यांनी दलित जागृतीसाठी 'सोमवंशी मित्र' (जुलै १८०८) नावाचे मासिक काढले. त्यातून त्यांनी अस्पृश्यांच्या हिताच्या दृष्टीने प्रभावी विचार मांडले. परंतु आर्थिक विवंचनेमुळे हे मासिक दीर्घकाळ चालले नाही. परंतु त्यांचे अस्पृश्यांच्या न्याय हक्काविषयीचे कार्य अतुलनीय होते असे म्हणता येईल. शिवराम जानबा कांबळे यांच्यानंतर नागपूरचे किसन फागुजी बंदसोड यांचे कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. कशाचीही तमा न बाळगता मोठ्या कष्टाने आणि हिंमतीने दलितांच्या हिताच्या रक्षणार्थ स्वतःचा छापखाना उभा केला. त्यांनी केलेले हे धाडस लक्षवेधक होते असे वाटते. आपल्या मूक बांधवांना हक्क, समानता मिळावी, त्यांच्यात जागृती व्हावी या उद्देशाने त्यांनी 'निराश्रित हिंदू नागरिक', 'विटाळ विध्वंसक' (१९१३), मजूरपत्रिका (१९१८), आणि चोखामेळा ही चार मासिके काढून आपल्या विचाराने संपूर्ण महाराष्ट्र हादरून सोडणारे हे महत्वाचे पत्रकार होते. परंतु आर्थिक विवंचनेमुळे त्यांची पत्रके मात्र फार काळ तग धरू शकली नाही. असे असले तरी त्यांनी अत्यंत हलाखीची प्रतिकूल परिस्थिती असतानाही अस्पृश्यांच्या उन्नतीचे ध्येय

बाळगून आपली पत्रे ज्या पद्धतीने जगवली आणि जागवली त्याबद्दल गंगाधर पानतावणे यांचे मत मोलाचे वाटते. ते म्हणतात की' ''अस्पृश्य मानलेल्या समाजाच्या सुधारणेला ज्याच्या प्रयत्नांची आवश्यकता आहे, अशी वर्तमानपत्रे चालवणे हा एक अत्यंत आवश्यक आणि महत्त्वाचा प्रयत्न होय. चळवळीचा प्रसार करण्याचे व लोकजगृती करण्याचे पत्र हे मुख्य साधन असते.''[५] अशाप्रकारे दलित आत्मउन्नतीसाठी महत्वाचे जागरण करणाऱ्या या दलित नियतकालिकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी केलेल्या या कार्याची दखल दस्तुरखुद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या 'मूकनायका'च्या पहिल्या अंकात किसन फागुजी बंदसोड आदींनी केलेल्या कार्याचा उल्लेख केला आहे. यावरून त्यांच्या एकूण कार्याचे महत्त्व समजू शकते. यानंतर काही अस्पृश्यानीही वृत्तपत्रे काढलेली दिसून येतात. अमरावती येथून गणेश अक्काजी तथा नानासाहेब गवई यांच्या पुढाकाराने आणि निळकंठ सखाराम भोगले यांच्या संपादनाखाली 'बहिष्कृत भारत' (१९१४) साली सुरू केलेले वृत्तपत्र महत्त्वाचे ठरते. 'मूकनायका'पूर्वी एकूणच दलितांनी काढलेल्या नियतकालिकांनी अस्पृश्यांच्या उद्धारसाठी सर्वतोपरीने आपापल्या पद्धतीने महत्त्वाचेच कार्य केलेले आहे असे आढळून येते. आर्थिक विपन्नावस्थेत असतानासुद्धा दीन-दलितांच्या जागृतीसाठीचे महत्त कार्य या दलित नियतकालिकांनी केले आहे असे म्हणता येते. मूकनायकाच्या प्रासंगिकतेचा विचार करताना दलित नियतकालिकाप्रमाणेच ब्राह्मणेतरांनीसुद्धा काही नियतकालिके चालवलेली होती त्यांचा थोडक्यात परामर्श घेणे महत्त्वपूर्ण होईल.

**ब्राह्मणेतरांच्या वृत्तपत्रांचा मागोवा**

सनातनी ब्राह्मणशाही विरोधात उठाव करण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीचा उदय झाला. महात्मा ज्योतिराव फुले यांचा विचार केंद्रस्थानी ठेवून ब्राह्मणेतर बहुजनांच्या जागृतीसाठी विविध वृत्तपत्रे काढलेली दिसून येतात. ''मुळात यापूर्वीची सर्व वर्तमानपत्रे ही ब्राह्मणशाहिच्याच हातात असल्याने बहुजन दुःखाचा, त्यांच्या समस्याचा स्वर त्यामध्ये येण्याऐवजी धार्मिक जीवनालाच अधिक महत्त्व दिले गेले. तसेच बहुजनांच्या हिता ऐवजी स्वातंत्र्याचे स्तोत्र, राष्ट्रभक्ती, आदी जोपासण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात होते.''[६] त्याचबरोबर ब्राह्मणशाहीतील वृत्तपत्रांमधून देशहिताचा आणि काही प्रमाणात समाजहिताचा विचार मांडला जात असला तरी त्याला मर्यादा होत्या. त्या म्हणजे पांढरपेशीवृत्तीच्या. आपल्या समाजा पलीकडे कोण राहतो याची त्यांना सुताराम काळजी नव्हती. किंबहुना



त्यांच्याकडे त्यांनी उपेक्षेनेच पाहिलेले दिसून येते. आपणच आपले भविष्य आणि समाजमन घडविले पाहिजे या उद्देशाने महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचे विचार डोळ्यांसमोर ठेवून ब्राह्मणेतरांनी आपल्या वृत्तपत्रसृष्टीला सुरुवात केली असे लक्षात येईल. 'दीनबंधू' (१८७७) 'अंबालहरी' (१८८१) 'सत्सार' (१८८५) 'शेतकऱ्यांचा कैवारी' (१८८१) 'राघवभूषण' (१८८८) 'सत्यप्रकाश' (१९०९) इ. वृत्तपत्राचा दाखला देता येईल. या वृत्तपत्रांमधून सनातनी ब्राह्मणशाही विचाराला तीव्र विरोध करून बहुजनांच्या अन्यायाला वाचा फोडून त्यांना विचार प्रवर्तक केले. परंतु या ब्राह्मणेतर वृत्तपत्रांनी बहुजनातील असणाऱ्या शुद्रादीशूद्र तळातील समाजाच्या प्रश्नांच्या, न्याय हक्काकडे मात्र कानाडोळा केला गेला. या ब्राह्मणेतर वृत्तपत्रांची ही अनास्था पाहून जननायक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनाला त्याची बोच स्पर्शून गेली. त्यामुळेच अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी, स्वतंत्र विचारांच्या अभिव्यक्तीसाठी स्वतःची वृत्तपत्रे असावी लागतात. यार्कारिताच बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे विचारांचे व्यासपीठ निर्माण केले. यातूनच मूकनायकाची प्रासंगिकता दिसून येईल.

**'मूकनायक'ची प्रासंगिकता**

वृत्तपत्रे ही शस्त्रासारखी असतात. या माध्यमासारखे सामर्थ्यशाली माध्यम हातात असल्याशिवाय अस्पृश्य समाजाला जागृत आणि प्रेरित करता येणार नाही. याचा विचार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जाने १९२० ला 'मूकनायक' हे पाक्षिक पत्र काढले. बाबासाहेबांनी मूकनायकाच्या पहिल्या अंकातील मनोगतात जे लिहिले त्यातून मूकनायकाची प्रासंगिकता लक्षात येईल. ते म्हणतात, ''आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रा सारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या पत्राकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीच पत्रे विशिष्ट जातीचेच हितसंबंध पाहणारी आहेत; इतर जातीच्या हिताची पर्वा त्यांना नसते. इतकेच नव्हे तर केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही प्रलाप त्यातून निघतात. अशा वृत्तपत्रकारांना आमचा एवढाच इशारा आहे की, कोणतीही एखादी जात अवनत झाली तर तिच्या अवनतीचा चट्टा इतर जातीस बसल्याशिवाय राहणार नाही. एका जातीचे नुकसान केल्याने नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात शंका नाही. म्हणून

स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करायचे पढत मूर्खाचे लक्षण शिकू नये. हा बुद्धिवाद ज्यांना कबूल अशी वर्तमानपत्रे निघाली आहेत, हे सुदैवाने म्हणायचे. ब्राह्मणेतर या पत्रातून बहिष्कृत समाजाच्या प्रश्नांची चर्चा वारंवार होते. परंतु ब्राह्मणेतर या अवडंबर या संज्ञेखाली मोडत असलेल्या अनेक जातींच्या प्रश्नांना ज्यात खल होतो त्यात बहिष्कृतांच्या प्रश्नांचा सांगोपांग उहापोह होण्यास पुरेशी जागा मिळणे शक्य नाही, हेही पण उघडचं आहे. त्यांच्या अती बिकट परिस्थितीशी सलग्न असलेल्या प्रश्नांची वाटाघाट करण्यास एक स्वतंत्र पत्र पाहिजे हे कोणीही कबूल करील. ही उणीव भरून काढण्यासाठी या पत्राचा जन्म झाला.''[७] यातून बाबासाहेबांच्या आंतरिक मनातील आच लक्षात येते. अस्पृश्यांच्या हक्काविषयी, समस्ये विषयीची बाजू मांडण्यासाठी हक्कांचे आपले स्वंय वर्तमानपत्र असल्याशिवाय अस्पृश्य समाजाला खरा न्याय, हक्क मिळूच शकणार नाही असे बाबासाहेबांना वाटत होते. या पत्राचा आरंभ करण्यापूर्वी राजर्षी शाहू महाराज १९२० साली मुंबईत आले असता काही समाजसेवकांनी बाबासाहेबांची मूकनायक वृत्तपत्र काढण्यापाठीमागची भूमिका स्पष्ट केली. ते ऐकून शाहू महाराजांना प्रचंड आनंद झाला. त्यांना ती कल्पना खूप पसंत पडली. त्या कामी मदत म्हणून लगोलग अडीच हजारांचा चेकही त्यांच्याकडे सुपूर्द केला. छत्रपती शाहू महाराजांच्या या भरघोस साह्याने ३०जानेवारी १९२० वार, शनिवार रोजी 'मूकनायक'चा अंक मोठ्या जोमाने प्रसिद्ध झाला.

खरे तर बाबासाहेबांनी ज्यांच्यासाठी या वृत्तपत्राचा प्रपंच केला ते दलित, अस्पृश्य यांच्यातील तत्कालीन वाचकांचे प्रमाण लक्षात घेतले तर हजारी नऊ इतके अल्प होते. असे असतानाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मूकनायक' काढण्याचे जे धाडस केले त्यातून त्यांच्या विचारदृष्टिची स्पष्ट जाणीव होते. यातून दलित समाजाच्या उन्नतीची, सुधारणेची, प्रगतीची आस असणारा हा नायक देशात नव्हे जगात अद्वितीय पुरुषापैकी एक होय. या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी म्हणतात की, ''दलित समाजामध्ये जगाच्या इतिहासात दोनच महान व्यक्ती होऊन गेल्या त्यामध्ये एक होते अमेरिकेतील मार्टिन लूथर आणि दुसरे होते भारतामधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर.''[८] हे लक्षात घेतले की अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याची महत्ती लक्षात येईल.

बाबासाहेबांनी 'मूकनायक'च्या संपादकपदी पांडुरंग नंदकुमार भटकर



यांची नियुक्ती केली. असे असले तरी बाबासाहेबच या पत्राची प्रेरक शक्ती होते. किंबहुना त्यांच्याच चळवळीचे मुखपत्र आहे याची सर्वांनाच जाणीव होती. त्याकाळी इतर अनेक लहानसहान वृत्तपत्र निघत होती. अशा वृत्तपत्राला प्रोत्साहन देण्याचे कार्य लो. टिळक यांच्या 'केसरी'ने केले. परंतु 'मूकनायक' या पत्राची दखल वा प्रोत्साहन देण्याचे सौजन्य टिळकांच्या 'केसरी'ने दाखवले नाही. ''किंबहुना आपल्या वृत्तपत्रात जागाच शिल्लक नसल्याचे कारण देऊन पैसे घेऊनही जाहिरात छापण्यास केसरीने नकार दिला.''[९] याचे कारण स्पष्ट होते, कारण बाबासाहेबांनी कोणाचाही मुलाहिजा न बाळगता परखड आणि स्पष्टपणे दलित समाजाच्या हिताचे प्रश्न मूकनायकतून धसास लावले. म्हणून की काय 'केसरी'ने 'मूकनायक'ला जागा दिली नसावी. पण बाबासाहेब या गोष्टीमुळे खचून जाणाऱ्यापैकी नव्हते. त्यांनी मोठ्या हिमंतीने 'मूकनायक'ची तयारी केली. आपल्या पत्राची बिरुदावली अनुरुप व अर्थपूर्ण असावी याचा शोध घेण्यासाठी बाबासाहेबांनी रामायण, दासबोध आदी असंख्य ग्रंथाचे अध्ययन करूनही त्यांना योग्य बिरुदावली मिळालीच नाही. त्यांच्या मनातील ती बिरुदावली विश्ववंद्य जगदुरू संत तुकारामाच्या अभंगगाथेमध्ये मिळाली ते वाचून बाबासाहेबांना खूप आनंद झाला तो अभंग पुढील प्रमाणे होता–

काय करू आता धरूनिया भीड
निशंक हे तोंड वाजविले।।
नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण
सार्थक लाजून नव्हे हित ।।

या अर्थपूर्ण व उद्बोधक अशा बिरुदावलीने 'मूकनायक'ला सुशोभित केले. कदाचित या संत तुकारामाच्या अभंगातील आशयावरूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वृत्तपत्राला 'मूकनायक' हे नाव दिले असावे असे वाटते.

बाबासाहेबांनी 'मूकनायक'च्या सुरुवातीच्या १२ अंकाचे अग्रलेख लिहिलेले आहेत. ''खरेतर बाबासाहेबांना विचार करण्याची सवय ही इंग्रजीत असल्याने 'मूकनायक'चा मजकूर ते इंग्रजीत लिहित आणि त्यानंतर त्याचे रूपांतर स्वतः मराठीमध्ये करीत असत. तेव्हा त्यांचा मूकनायक म्हणजे 'मूक जनांना बोलायला लावणारे साधन आहे.''[१०] अस्पृश्य समाज हा मूक असलेला, दबलेला असा समाज आहे. मुळात तो हिंदू धर्मातील सनातनी आचार विचारांनी व रूढी बंधनांनी त्रस्त झालेला होता. अशा या हतबल असणाऱ्या अस्पृश्य

समाजाला आपल्यावरील होणाऱ्या अन्यायाचा, दुःखाचा पाडा वाचता येत नाही. त्यांचे हे दुःख वेशीवर टांगण्याच्या दृष्टीने मूकनायकाच्या अग्रलेखातून बाबासाहेबांनी या समाजाच्या वेदनेचा अंगार लेखातून प्रखर आणि प्रभावीपणे मांडला. ते लिहितात की, हिंदू समाज हा एक मनोरा आहे म्हणजे त्याचा एक एक मजला होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, या मनोऱ्याला शिडी नाही आणि म्हणून एक मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यावर त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्या प्रवेश नाही. वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला वरच्या मजल्या प्रवेश नाही. त्याला खालच्या मजल्यावर लोटून देण्याची कोणाची प्रज्ञा नाही. (अंक-१ ,३१ जानेवारी १९२०) यातून जातीजातीतील असलेल्या श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भावना या गुणावगुणांवर झाल्या नसून त्या कोणत्या जातीत जन्मलेला आहे यावरून ठरल्या गेल्या आहेत. उच्च जातीत जन्मलेला असेल आणि तो अवगुणाने बरबटलेला असेल तरी तो उच्च आणि कनिष्ठ जातीत जन्माला असेल आणि तो कितीही गुणी असेल त्याला नीच म्हणूनच गणले गेले आहे. यासारख्या विषयावर बाबासाहेब आपले प्रभावी आणि स्पष्ट चिंतन अग्रलेखातून समाजाला चिंतन प्रवृत्त करतात. त्यामुळेच बाबासाहेबांचे प्रत्येक अग्रलेख लक्षणीय वाटतात. या 'मूकनायक'च्या विविध अग्रलेखातून अस्पृश्य समाजाला समाजउन्नतीचा मार्ग दाखविला. त्यांच्या विविध अग्रलेखाचे शीर्षक पाहिले तर आपणास समजून येते. उदा. 'स्वराज्य नव्हे हे तर आमच्यावर राज्य', 'स्वराज्याची सर सुराज्याला नाही', 'स्वराज्यातील आमचे आरोहण', 'दास्यालोकन' अशा प्रकारच्या अनेक अग्रलेखातून बाबासाहेबांच्या विचारांच्या दृष्टेपणाचे दर्शन घडत जाते. किंबहुना तेज, सत्व, कायदा, प्रमाण यांचा अनोखा संगम त्यांच्या लेखणीतून प्रसवताना दिसतो. त्यांची अस्पृश्यांबद्दलची असणारी तळमळ केवळ लेखनातच नाही तर त्यांच्या बोलण्याच्या शब्दांशब्दातून अभिव्यक्त होताना दिसते. २१मार्च१९२० अस्पृश्यांच्या परिषदेत भाषणातून जो विषय बाबासाहेबांनी मांडला त्या विषयावर भाष्य करताना कोल्हापूरचे राजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज म्हणाले की, "आता अस्पृश्य समाजाला त्यांचे दुःख जाणारा खरा नायक मिळाला. या समाजाचे पुढील भवितव्य उज्वल आहे."[११] अशाप्रकारे बाबासाहेबांनी 'मूकनायक' पत्रातून दलित समाजाला जागृत करीत त्यांना त्यांच्या आत्मोन्नतीचा मार्ग



दाखविलेला आहे, हे मान्य करावे लागते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९१७ साली आर्थिक कारणास्तव आपला इंग्लंडमधील विद्याभ्यास सोडून मुंबईला आले होते. तो अपूर्ण राहिलेला अभ्यास पूर्ण करण्याच्या दृष्टीने आर्थिक व्यवस्था होताच १९२० च्या जुलै, मध्ये बाबासाहेब लंडनला रवाना झाले. जात असताना मात्र 'मूकनायक' पत्र बंद न करता तो पुढे व्यवस्थापक मंडळाच्या सल्ल्याने चालविण्याचे ठरले. संपादक असलेले भटकर हे मुळात थंड प्रवृत्तीचे आणि घरगुती नाना अडचणीने त्रस्त असल्याने त्यांच्याकडून 'मूकनायक'चे काम वेळेवर होत नव्हते. त्यामुळे व्यवस्थापक मंडळाने त्यांच्याकडून संपादकीय सूत्र काढून घेतली. आणि ज्ञानदेव नवनाथ घोलप यांच्या हाती सुपूर्द केली. मूकनायक कसा चालला पाहिजे या दृष्टीने लंडन येथून बाबासाहेब सूचना पाठवित असत. हे पत्र दीर्घकाळ चालावे अशी बाबासाहेबांची इच्छा होती. परंतु बाबासाहेबांची ही इच्छा अपूर्णच राहिली. संपादक ज्ञानदेव घोलप यांनीही 'मूकनायक'ची जबाबदारी व्यवस्थित पार पाडली नाही. किंबहुना त्यांनी कर्जाचा डोंगर उभा करू आर्थिक भार वाढवला. परिणामी मूकनायक बंद झाले. हे कळताच बाबासाहेबांना तीव्र वेदना झाल्या. एकूणच वृत्तपत्राला बाजारू स्वरूप न येऊ देता बाबासाहेबांनी प्रचंड कष्टाने आणि मेहनतीने मूकनायक काढून दीन-दलितात जागृती आणि आत्मोन्नती करण्याचे कार्य केले.

**निष्कर्ष**

१) 'मूकनायक'ची भाषा सहज व सोपी असल्याने कमी कालावधीत जनसामान्यांना ते प्रभावित करू शकले.

२) मूकनायकाची प्रासंगिकता पाहता त्यात कोणताही विषय वर्ज्य असलेला दिसून येत नाही. किंबहुना मानवी समाजजीवनाच्या क्षेत्रात येणारा प्रत्येक विषय तितक्याच ताकदीने त्यांनी हाताळला आहे.

३) अस्पृश्य समाजाला चेतना देण्याचे महानकार्य मूकनायक या पाक्षिकाने केले.

४) मूकनायक पत्राने बाबासाहेबांना सिद्धहस्त पत्रकार म्हणून पत्रकारितेच्या इतिहासात चिरंतन केले.

**संदर्भ सूची**

१. सुधांशू, समकालीन भारतीय साहित्य वर्ष ४१, अंक २१४ मार्च -एप्रिल २०२१, पृष्ठ ९

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड-३, डॉ. बाबासाहेब आंबेडकरकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई पृष्ठ.२०८.

३. डॉ. प्रल्हाद लुलेकर, अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा: दलितेतरासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सायन पब्लिकेशन प्रा.लि. पुणे चौथी आवृत्ती २०१५.

४. गंगाधर पानतावणे, नियतकालिकांची वाटचाल एक दृष्टिकोन: संपा. नागोराव कुंभार, प्रबोधन प्रकाशन, लातूर. पृष्ठ.५६.

५. गंगाधर पानतावणे, विद्रोहाचे पाणी पेटले आहे, संघर्ष प्रकाशन, नागपूर १९८६.पृष्ठ.४७.

६. चांगदेव खैरमोडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, खंड १, सुगावा प्रकाशन, पुणे, पृष्ठ.९९.

७. रा.के. लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९८४ पुणे, पृष्ठ ५७९

८. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, महामानव, चेतश्री प्रकाशन, अमळनेर पृष्ठ १५.

९. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, १९६६, मुंबई.पृष्ठ.५४

१०. रा.के.लेले, उनि.पृष्ठ.५८५.


११. चांगदेव खैरमोडे, उनि.पृष्ठ१९६.

**डॉ. गोविंद उफाडे**

राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त, लातूर.

भ्रमणध्वनी - ९४०४२७१६३५

०००





"आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमान पत्रासारखी अन्य भूमीच नाही..."

"समाज ही एक नौकाच आहे. व ज्याप्रमाणे आगबोटीत बसून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे म्हणून म्हणा किंवा त्यांची त्रेधा कशी उडते ही गम्मत पाहण्यासाठी म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा, जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधि ही घ्यावीच लागणार आहे. त्याच प्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार, यात बिल्कूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करण्याचे पढतमूर्खांचे लक्षण शिकू नये. हा बुद्धिवाद ज्यांना कबूल आहे अशी वर्तमानपत्रे निघाली आहेत हे सुदैवच म्हणावयाचे..."

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

('मूकनायक' व 'बहिष्कृत भारत'च्या पहिल्या अग्रलेखातून)




अरुणा प्रकाशन, लातूर
१०३, ओंकार कॉम्प्लेक्स-अ, खर्डेकर स्टॉप,
औसा रोड, लातूर मो. ९४२१४८६१३५

ISBN 978-93-5240-198-7